# ९. मी वाचवतोय

**सतीश काळसेकर** (१९४३) : प्रसिद्ध कवी. 'इंद्रियोपनिषद', 'साक्षात', 'विलंबित' हे कवितासंग्रह; 'कविता लेनिनसाठी' या लेनिनवरच्या जगभरातील कवितांच्या अनुवादांच्या संग्रहाचे संपादन. 'तात्पर्य', 'मागोवा', 'लोकवाङ्‌मय' या नियतकालिकांच्या संपादनात सहभाग.

वेगाने बदलत जाणाऱ्या समाजाचे वास्तव चित्र प्रस्तुत कवितेतून कवीने रेखाटले आहे. कवी त्यांच्या स्वतंत्र अस्तित्वाच्या गोष्टी वाचवू इच्छितात. महानगरी जीवनातील अस्तित्वाच्या अवकळेचे, भोवतालच्या सामाजिक स्थितींचे चित्रण काळसेकर यांच्या कवितेत आहे. प्रस्तुत कविता साधना दिवाळी अंक २००५ या मासिकातून घेतली आहे.

हाकेतून हद्दपार होतेय आई
हंबरायच्या थांबल्यायत गोठ्यातल्या गाई

हरवत चाललाय किराणा आणि भुसार
सुपर मार्केटच्या झगमगाटात झरझर
लोहाराचा भाता आणि कुंभाराचा आवा
निघून चाललाय गावगाड्यासोबत मुकाट

कल्हईची झिलई विस्तवासोबत निघून गेली
मागच्या धगीवर रटरटणारी आमटी
राखेसहित दुरावत गेली गॅसच्या शेगडीवर

बोलाचालीतून निघून चाललीय माझ्या आईची बोली
सुटीत आता खेळत नाहीत मुलं
विटीदांडू आणि लगोऱ्या
थांबून गेलाय त्यांचा दंगा,
आट्यापाट्या आणि पिंगा
परकऱ्या मुली खेळत नाहीत आता
आधीचे मातीतले खेळ

पोरं आता दंग असतात दूरदर्शनच्या चॅनेलवर
बघत क्रिकेटची मॅच
आणि उलगडत क्राइम-थ्रिलर

लिहिते हात आता राहिले नाहीत लिहिते
शब्द बापुडे केवळ वारा
तसे विरून जातायत

मी वाचवतोय माझी कविता
आणि माझी आई
आणि माझी बोली
आणि माझी भूमी
कवितेसोबत




**प्र. १. कोष्टक पूर्ण करा.**

| पूर्वीचे व्यवसाय | पूर्वीचे खेळ |
|---|---|
| ____________ | ____________ |
| ____________ | ____________ |
| ____________ | ____________ |

**प्र. २. आकृती पूर्ण करा.**

(अ)




**प्र. ३. सकारण लिहा.**

| जुन्या गोष्टींपैकी वाचवाव्या वाटणाऱ्या गोष्टी | तुमच्या मते त्या गोष्टी वाचवण्याची कारणे |
|---|---|
| | |

**प्र. ४. काव्यसौंदर्य.**

(अ) तुम्हांला जाणवलेली कवीच्या मनातील खंत स्पष्ट करा.

(आ) ‘शब्द बापुडे केवळ वारा’ या काव्यपंक्तीतील आशयसौंदर्य शब्दबद्ध करा.

(इ) सामाजिक बदलांबाबत कवितेतून व्यक्त झालेला विचार स्पष्ट करा.

**प्र. ५. स्वमत.**

(अ) ‘माझी बोली’ या संकल्पनेतून तुम्हांला समजलेला कवीचा दृष्टिकोन स्वभाषेत मांडा.

(आ) ‘मॉलच्या अतिक्रमणामुळे छोट्या दुकानदारांना फटका बसतो’ याबाबत तुमचे मत स्पष्ट करा.

**उपक्रम :** तुमच्या अवतीभवती घडणाऱ्या सामाजिक बदलांची खालील मुद्द्यांच्या आधारे नोंद करा व कोष्टक तयार करा.

| बदल | परिणाम | तुमचे मत |
|---|---|---|

FJDTFB